**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय ०९–०००४९६–२०२५**

**नियमीत फौजदारी खटला क्र.७१/२०२५**

**निशाण क्र.७ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार स्मिरा स्वप्निल कुबडे यांनी देवगड पोलीस ठाणे यांचेकडील गुन्हा क्र.१३५/२०२५ मध्ये जप्त केलेला उपडाकपाल, तळेबाजार डाकघर, ता.देवगड यांच्या मालकीचा सॅमसंग गॅलॅक्सी ए१४ कंपनीचा मोबाईल सुपुर्तनाम्यावर मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

०२. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, देवगड पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्र.१३५/२०२५ चे कामी आरोपी गुरुदास अनंत मेस्त्री याचे ताब्यातून अर्जदार यांच्या उपडाकपाल, तळेबाजार डाकघर, ता.देवगड यांचे कार्यालयीन कामकाजातील सॅमसंग गॅलॅक्सी ए१४ त्याचा आय.एम.ई.आय.क्र.३५४८८९६६१ ३७१८६२ व ३५५५७८३३१३७१८६० हा मोबाईल जप्त केला आहे. सदरचा जप्त मोबाईल हा उपडाकपाल, तळेबाजार डाकघर, ता.देवगड यांना नियमित कार्यालयीन कामकाजाकरिता अत्यंत आवश्यक आहे. सदरचा मोबाईल हा मा.अधीक्षक डाकघर, सिंधुदुर्ग ओरोस यांचे कार्यालयाकडून उपडाकपाल, तळेबाजार डाकघर, ता.देवगड यांना कार्यालयीन कामकाजाकरिता देण्यात आलेला होता. सदरचा जप्त मोबाईल बंद स्थितीत पोलीस ठाणे, देवगड, ता. देवगड येथे राहिल्यास सदर मोबाईल व त्याची बॅटरी खराब होण्याची दाट शक्यता आहे. सबब, अर्जदार यांनी वर नमुद मोबाईल अर्जदार यांच्या ताब्यात द्यावे अशी विनंती केली आहे.

०३. अर्जदार यांनी निशाणी क्र.८/१ येथे गुन्हा क्र.१३५/२०२५ ची प्रथम खबरी अहवालाची प्रत, निशाणी क्र.८/२ दि.२७/०३/२०२४ रोजीच्या पत्राची झेरॉक्स प्रत, निशाणी क्र.८/३ येथे अधीक्षक डाक घर, सिंधुदुर्ग

यांच्याकडील ई–मेल द्वारे प्राप्त पत्राची झेरॉक्स प्रत, निशाणी क्र.८/४ येथे अर्जदार यांच्या कार्यालयीन ओळखपत्राची झेरॉक्स प्रत व निशाणी क्र.८/५ येथे अर्जदार यांच्या आधारकार्डची झेरॉक्स प्रत इत्यादी कागदपत्रे हजर केली आहेत.

०४. सदर अर्जावर तपासी अंमलदार व सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी निशाणी क्र.९ येथे म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्या नुसार सदर मोबाईल योग्य त्या अटी शर्तीसह अर्जदार यांच्या ताब्यात देण्यास हरकत नसल्याचे लेखी कळविले आहे. सदर अर्जावर आरोपीने निशाणी क्र.१० येथे म्हणणे दाखल करुन आरोपीची हरकत आहे असे कळविले आहे.

०५. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपी तर्फे वकील श्री. के.के.मराठे यांच्या तर्फे करण्यात आलेले युक्तिवाद ऐकले. अभिलेखाचे काळजीपुर्वक अवलोकन केले. अर्जदार यांनी निशाणी क्र.८/२ येथे हजर केलेल्या पत्रावरुन असे दिसून येते की, जप्त मोबाईल हा उपडाकपाल, तळेबाजार डाकघर, ता. देवगड यांना कार्यालयीन वापराकरिता देण्यात आला होता. तसेच पत्र निशाणी क्र.८/३ याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अधीक्षक डाक विभाग, सिंधुदुर्ग यांनी पत्राद्वारे प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास उपडाकपाल, तळेबाजार डाकघर, ता. देवगड यांना अधिकार दिले आहेत. प्रस्तुत अर्जदार या उपडाकपाल, तळेबाजार डाकघर, ता. देवगड येथे पोस्टल असिस्टंट या पदावर कार्यरत असून त्याबाबत त्यांनी आपले कार्यालयीन ओळखपत्र निशाणी क्र.८/४ येथे दाखल केले आहे. तसेच निशाणी क्र.८/५ येथे आपल्या आधारकार्डाची झेरॉक्स प्रत हजर केली आहे. वरील सर्व कागदोपत्री पुराव्यांचे अवलोकन केले असता हे स्पष्ट होते की, देवगड पोलीस यांनी गुन्हा क्र.१३५/२०२५ च्या तपासाकामी जप्त केलेला मोबाईल हा उपडाकपाल, तळेबाजार डाकघर, ता. देवगड या कार्यालयातील मोबाईल आहे. तसेच अर्जदार यांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्याचा अधिकार आहे. अर्जदार यांच्या कथनानुसार जप्त मोबाईल पोलीस स्टेशन येथे बंद राहिल्यास मोबाईलमध्ये तांत्रिक बिघाड होण्याची शक्यता

नाकारता येत नाही. जरी आरोपी यांनी मोबाईल परत देण्यास हरकत दर्शवली असली तरी त्याचे सविस्तर स्पष्टीकरण दिलेले नाही. याउलट तपासी अधिकारी व सहाययक सरकारी अभियोक्ता यांनी अर्जदार यांना मोबाईल परत देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे. अशा परिस्थितीत माझ्या मते अर्जदार या प्रस्तुत प्रकरणातील मोबाईलचा तात्पुरता ताबा मिळण्यास पात्र आहेत.

०६. वरील कारणमिमांसेचा सारांश असा आहे की, अर्जदार यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | अर्ज नि.क्र.७ खालील अटी व शर्तीवर मंजुर करण्यात येतो. |
| २. | जप्त सॅमसंग गॅलॅक्सी ए१४ त्याचा आय.एम.ई.आय. क्र.३५४८८९६६१३७१८६२ व ३५५५७८३३१ ३७१८६० हा मोबाईल अर्जदार स्मिरा स्वप्निल कुबडे यांना रक्कम रुपये ५,०००/- (अक्षरी पाच हजार रुपये) च्या सुपुर्तनाम्यावर तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येते. अर्जदाराने स्वतः सुपुर्तनामा खालील शर्ती नमुद करुन संबंधित पोलीस स्टेशनमध्ये सादर करावा. |
| ३. | अर्जदार यांनी वरील मोबाईल बाबत विक्री, गहाण अथवा इतर कुठलाही व्यवहार केस प्रलंबित असे पर्यंत करु नये तसेच मोबाईलच्या परिस्थितीमध्ये देखील बदल करु नये व न्यायालयाला आवश्यक वाटल्यास मोबाईल न्यायालयात हजर करावा. |

| | |
|---|---|
| ४. | अर्जदार यांनी वरील मोबाईलचा कोणत्याही गुन्हयात वापर करु नये. |
| ५. | तपासी अंमलदार, देवगड पोलीस स्टेशन यांनी वरील मोबाईल अर्जदार स्मिरा स्वप्निल कुबडे, रा. तळेबाजार, ता.देवगड यांच्या ताब्यात द्यावे. |
| ६. | तपासी अधिकारी यांनी वरील मोबाईलचे दोन फोटो आणि मोबाईल अर्जदार यांच्या ताब्यात दिल्याबाबतचा सविस्तर पंचनामा सादर करावा. |
| ७. | तपासी अधिकारी यांनी वरील आदेशाचे तंतोतंत पालन करावे. |

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.10.10 15:24:33 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिनांकः १०/१०/२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग –१, देवगड